शनिवार, दि. १३ सप्टेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# ग्रामीण भागातील विकासात ग्रामपंचायतींची भूमिका अत्यंत महत्त्वाची - आ. लोणीकर





**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' अंतर्गत सेवा पंधरवडा निमित्त आज जालना जिल्ह्यात परतूर आणि मंठा तालुक्यांमध्ये दोन भव्य कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळांना माजी मंत्री आणि परतूरचे लोकप्रिय आमदार बबनराव लोणीकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून ग्राम पंचायत प्रतिनिधींना आणि अधिकाऱ्यांना अभियानात सक्रिय सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित केले. परतूर येथील भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी नाट्यगृहात सकाळी १० वाजता झालेल्या पहिल्या कार्यशाळेत परतूर पंचायत समिती आणि जालना पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या नेर व सेवली गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विस्तार अधिकारी आणि शासकीय यंत्रणेच्या प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. दुपारी १२ वाजता मंठा तालुक्यातील वैशाली मंगल कार्यालयात मंठा पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या सर्व ग्रामपंचायतींच्या प्रतिनिधींसाठी दुसरी कार्यशाळा संपन्न झाली. या दोन्ही कार्यशाळांमध्ये आमदार बबनराव लोणीकर यांनी अभियानाच्या उद्दिष्टांबाबत सविस्तर मार्गदर्शन करून उपस्थितांना प्रेरणा दिली. गटविकास अधिकारी, पंचायत समिती परतूर व मंठा यांनीही सर्वांना या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन केले. आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या ओजस्वी भाषणात अभियानाचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान ही केवळ एक योजना नाही, तर ग्रामीण महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी एक ऐतिहासिक चळवळ आहे. ही चळवळ विकसित महाराष्ट्र २०४७ च्या स्वप्नाला प्रत्यक्षात आणण्यासाठी पंचायत राज संस्थांना सक्षम आणि स्वावलंबी बनवण्याचे ध्येय ठेवते. ग्राम ीण भागातील विकासात ग्रामपंचायतींची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, आणि या अभियानामार्फत आपण आपली गावे समृद्ध, स्वच्छ आणि आत्मनिर्भर बनवू शकतो. त्यांनी पुढे सांगितले, माननीय मुख्यमंत्र्यांनी पंचायत राज संस्थांना अधिक सक्षम करण्याचे निर्देश दिले होते, आणि त्यानुसार माननीय ग्रामविकास मंत्र्यांनी या अभियानाची संकल्पना मांडली. १० मार्च २०२५ रोजी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणात या अभियानाची घोषणा केली होती. या अभियानाद्वारे तालुका, जिल्हा, महसूल विभाग आणि राज्यस्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदांना प्रोत्साहन दिले जाईल. जालना जिल्ह्यातील परतूर आणि मंठा तालुक्यात आज आयोजित कार्यशाळा हा त्याचाच एक भाग आहे, आणि यात आपल्या सर्वांचा उत्साहपूर्ण सहभाग पाहून मला अतिशय आनंद होत आहे.

**अभियानाचा कालावधी आणि तयारी बाबत आमदार बबनराव लोणीकर यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन**

आमदार लोणीकर यांनी अभियानाच्या कालावधीबाबत सविस्तर माहिती देताना सांगितले, हे अभियान १७ सप्टेंबर २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत राबवले जाईल. याची पूर्वतयारी म्हणून तालुका आणि जिल्हास्तरावर प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामपंचायतींना प्रशिक्षण देणे आणि तालुकास्तरीय अधिकाऱ्यांना संपर्क अधिकारी म्हणून नेमणे यासारखी पावले उचलली जात आहेत. १७ सप्टेंबर रोजी विशेष ग्रामसभा घेतली जाईल, ज्यात अभियानास अनुसरून विषयवार लहान गट स्थापन केले जातील. अभियानाच्या कालावधीत सर्व मुद्द्यांवर कार्यवाही करून दैनंदिन अहवाल पद्वारे पाठवणे बंधनकारक आहे. ऑक्टोबर ते नोव्हेंबर या काळात संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल. त्यांनी कार्यशाळांच्या तयारीबाबत बोलताना सांगितले, जिल्हास्तरीय कार्यशाळा २५ ते ३० ऑगस्ट २०२५ दरम्यान झाल्या या वेळी लोकप्रतिनिधी, सरपंच आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तालुका किंवा पंचायतस्तरीय कार्यशाळा १ ते ५ सप्टेंबर २०२५ दरम्यान आयोजित झाल्या, तर ग्रामस्तरीय कार्यशाळा ६ ते १० सप्टेंबर २०२५ दरम्यान संपन्न झाल्या. आजच्या कार्यशाळा ग्रामस्तरीय तयारीचा भाग असून, यातून मिळालेले मार्गदर्शन प्रत्येकाने आपल्या गावात अंमलात आणावे, अशी माझी अपेक्षा आहे.असे आमदार बबनराव यांनी नमूद केले.

**अभियानाचे मूल्यमापन आणि प्रमुख घटक या विषयी आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली विस्तृत माहिती**

आमदार बबनराव लोणीकर यांनी अभियानाच्या मूल्यमापनाबाबत सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले, या अभियानाचे मूल्यमापन १०० गुणांवर आधारित आहे आणि त्यात आठ प्रमुख घटकांचा समावेश आहे. सुशासनयुक्त पंचायत हा पहिला घटक आहे, ज्यात लोकाभिमुख प्रशासन, ऑनलाइन सेवांचा विस्तार, नागरी सेवा सुविधा केंद्रातून शासकीय दाखले, तक्रार निवारण, ग्रामपंचायत वेबसाइट अद्ययावत करणे, सीसीटीव्ही बसवणे, लेखापरीक्षण, ग्रामसभांचे कार्यवृत्त नोंदवणे, आयुष्यमान भारत कार्ड आणि पान २ वर

## युवा आदर्श

### उत्तर ...

आदेश वरिष्ठा तर्फे
कामातून द्या उत्तर
दिसो स्वच्छ प्रतिमा
टिकांकारा निरूत्तर
जन सेवा उठावदार
जाईलं सत्ता बेहत्तर
जनकार्य दिसो स्पष्ट
बांधायचे नीट सुत्तर
कमी करायचे शत्रुत्व
वाढवा पुष्कळ मैतर
श्राद्धतर्पण दानार्पण
संतुष्ट करायचे पितर
कुटुंब प्रमुख आपला
खुश आपोआप इतर
आरोप करा बेधडक
ना करी जमा खातर
एकदा जनमत बनले
प्रगती गति उत्तरोत्तर
वातावरण हो पोषक
नको द्यायला दुरूत्तर
विरोध जाई विरघळू
बदलून टाका चित्तर
शांत होतीलं दुतोंडी
फड फडून फार तर
जुजबी नको जबाब
माहिती दे सविस्तर
वाटे तसे सोपे नसते
राजकारण खडतर

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# महावितरण कर्मचाऱ्यांची मुजोरी; पत्रकारांबद्दल अपमानास्पद वक्तव्ये; जिल्हाधिकाऱ्यांकडे निलंबनाची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील महावितरण कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एका पत्रकारासोबत गैरवर्तन करत सर्वच पत्रकारांबद्दल अपमानास्पद व बेजबाबदार वक्तव्य केल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. एका वैयक्तिक कामासाठी गेलेल्या पत्रकाराला समाधानकारक उत्तर देण्याऐवजी, 'हे पत्रकार लबाड असतात,' 'राजकीय लोकांचे तळवे चाटतात' अशी भाषा वापरून अपमानित करण्यात आले. या घटनेमुळे पत्रकार संघटनांमध्ये तीव्र रोष असून, इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देत दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या तात्काळ निलंबनाची मागणी केली आहे. मागणी मान्य न झाल्यास २५ सप्टेंबर रोजी आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

स्थानिक पत्रकार सुनील भारती हे ११ सप्टेंबर रोजी ग्रामीण वीज बिल कार्यालयात वाढीव बिलासंदर्भात माहिती घेण्यासाठी गेले होते. त्यावेळी कार्यालयात उपस्थित तीन पुरुष व एक महिला कर्मचारी यांनी त्यांना सम ाधानकारक उत्तर दिले नाही. भारती यांनी उपकार्यकारी अभियंता भरत खिल्लारे यांच्याशी संपर्क साधल्यावर, त्यांनी कर्मचाऱ्यांशी फोनवर बोलणे करण्यास सांगितले. मात्र, त्यावेळीही कर्मचाऱ्यांनी समाधानकारक प्रतिसाद दिला नाही.

सुनील भारती कार्यालयातून बाहेर पडत असतानाच, त्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्याबद्दल आणि सर्वच पत्रकारांबद्दल अपमानास्पद वक्तव्ये करण्यास सुरुवात केली. 'हे पत्रकार लोक लबाड असतात,' 'हे राजकीय लोकांचे तळवे चाटतात,' 'या काही लोकांकडे सायकल-मोटरसायकलवर येणारे पत्रकार एका वर्षात दोन-दोन मजली घरे बांधतात,' 'या लोकांची लायकी दाखवली पाहिजे,' असे उद्दाम वक्तव्य त्यांनी केले. एका महिला कर्मचाऱ्यानेही त्यात सहभाग घेतला.

या प्रकाराची माहिती मिळताच पत्रकार सुनील भारती यांनी पुन्हा उपकार्यकारी अभियंता भरत खिल्लारे यांना फोन केला. खिल्लारे साहेब कार्यालयात आल्यावर भारती यांनी त्यांच्यासमोर कर्मचाऱ्यांच्या गैरवर्तनाबद्दल जाब विचारला. त्यावेळी कर्मचाऱ्यांनी बोललेले वक्तव्य कबूल केले. आम्ही काहीही बोलू शकतो, लोकशाहीमध्ये बोलण्याचा अधिकार आहे, असे उद्धट उत्तर त्यांनी खिल्लारे पान २ वर

निवासी जिल्हाधिकारी यांची पत्रकारांच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन वेळोवेळी पत्रकारांना अपमानित करण्याच्या घटना होत असल्याचे प्रेस कॉन्सील ऑफ म हाराष्ट्र जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी निदर्शनास आणून दिले. यापूर्वी देखील आस्था हॉस्पिटलचे डॉ. आदिनाथ पाटील यांनी अपशब्द वापरले होते. त्यावेळीही निवेदन देण्यात आले होते. मात्र त्यावर अद्याप कारवाई झाली नसल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या लक्षात आणून दिले असता त्यांनी स्मरण पत्र पाठविण्यात येईल असे सांगत कारवाईचे आश्वासन दिले आहे. दोन्ही प्रकरणात येत्या २५ सप्टेंबर २०२५ पूर्वी कारवाई न झाल्यास २५ तारखेला एक दिवसीय आंदोलनाचा इशारा इंडियन जर्नलिस्ट असोसिएशन व प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालनाच्यावतीने देण्यात आला आहे.

# पोलिसांनी गुन्ह्यांचा घेतला आढावा; मराठा आंदोलन हाताळल्याबद्दल जालना पोलिसांचे कौतुक





**जालना । प्रतिनिधी -** विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र, यांनी आज जालना येथे गुन्हे आढावा बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी जिल्ह्याच्या पोलीस प्रशासनाने केलेल्या कामगिरीचे कौतुक केले, तसेच विविध गुन्ह्यांचा आढावा घेऊन आवश्यक सूचना दिल्या.

**उल्लेखनीय कामगिरीबद्दल गौरव**

या बैठकीच्या सुरुवातीला मा. विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी मराठा आंदोलनादरम्यान उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल जालना पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, अंबड उपविभाग, गोंदी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी आणि इतर पोलीस अंमलदार यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला. तसेच, नुकताच पार पडलेला गणपती उत्सव आणि ईद-ए-मिलादच्या बंदोबस्तासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक, सर्व अधिकारी आणि अंमलदार यांचे अभिनंदन करण्यात आले.

**गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सूचना**

मा. विशेष पोलीस महानिरीक्षकांनी खून, खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, वाहन चोरी अशा प्रलंबित गुन्ह्यांचा आढावा घेतला. हे गुन्हे लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. त्यांनी स्थानिक गुन्हे शाखा आणि दहशतवाद विरोधी पथकाच्या कामकाजाचेही मूल्यांकन केले आणि जिल्ह्यात अमली पदार्थ आणि अवैध धंद्यांवर जास्तीत जास्त प्रभावी कारवाई करण्याचे निर्देश दिले.

**अंमली पदार्थांवर कारवाईसाठी विशेष पथक**

अंमली पदार्थांवर नियंत्रण मि ळवण्यासाठी मा. विशेष पोलीस महानिरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष पान २ वर

# भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांची पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्याशी जालना येथील विकासकामांवर चर्चा




**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टीचे जालना म हानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांनी आज जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांची भेट घेतली. या बैठकीत जालना विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांवर सविस्तर चर्चा झाली.

या चर्चेदरम्यान, दानवे यांनी जालना शहरासह म तदारसंघातील स्थानिक पातळीवरील पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या मूलभूत सुविधांची माहिती दिली. तसेच, सध्या सुरू असलेले आणि निधीअभावी रखडलेले प्रकल्प लवकर पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी पान २ वर

## संपादकीय

### लोकशाहीचा गळा घोटण्याचा प्रयत्न

लोकशाहीत पत्रकार हा फक्त चौथा स्तंभ नसतो, तर तो जनतेचा श्वास असतो. त्या श्वासालाच गुदमरवण्याचे काम जालना व परतूरातील अलीकडच्या घटनांनी केले आहे. महावितरण कार्यालयातील काही उद्दाम कर्मचारी आणि परतूरातील वाळू माफिया यांनी पत्रकारांवर केलेले अपमानास्पद वक्तव्य व थेट हल्ला हा लोकशाहीच्या पायाभरणीवर घाव आहे. महावितरण कर्मचारी ‘हे पत्रकार लबाड असतात, राजकीय लोकांचे तळवे चाटतात’ असे वक्तव्य करतात आणि वरिष्ठ अधिकारीही ‘तुम्हाला जे करायचे ते करा’ असे उत्तर देतात, ही केवळ उद्धटाई नाही तर माजातून आलेली दडपशाही आहे. जे अधिकारी जनतेची सेवा करायला बसले आहेत, तेच जर लोकशाहीचे प्रहरी असलेल्या पत्रकारांना अपमानित करणार असतील, तर मग जनतेचे रक्षण कोण करणार? परतूरमध्ये पत्रकार आणि त्यांच्या पत्नीवर जीवघेणा हल्ला करून वाळू माफियांनी दाखवून दिले की, सत्य सांगणाऱ्यांचे गळे दाबण्यास ते मागे हटणार नाहीत. जातीवाचक शिवीगाळ, धमक्या आणि हिंसा हा प्रकार केवळ गुन्हा नाही, तर पत्रकारितेच्या स्वातंत्र्यावर थेट दहशतवादी हल्ला आहे. आज प्रश्न आहे तो फक्त पत्रकारांचा नाही, तर संपूर्ण लोकशाहीचा आहे. जर पत्रकारांवर अशा उघडपणे हल्ले होऊ शकतात, तर उद्या सामान्य माणूस आवाज उठवेल तरी त्याचे काय होणार? जिल्हाधिकारी आणि पोलीस प्रशासनाने तात्काळ कारवाई केली नाही तर हे सर्व प्रकार जनतेच्या विश्वासघाताचे उदाहरण ठरतील. पत्रकार संघटनांनी दिलेला आंदोलनाचा इशारा हा केवळ पत्रकारांचा लढा नाही, तर लोकशाही व अभिव्यक्ती स्वातंत्र्य वाचवण्याचा लढा आहे. प्रशासन जर वेळेत कारवाई करणार नसेल, तर हा संघर्ष अधिक तीव्र होईल.




# आत्महत्या करण्यापेक्षा जिगरबाज बनून संकटावर मात करा

आजकाल देशात आत्महत्या करणाऱ्या लोकांचा आकडा खूप वाढला आहे. जगात भारत हा असा एकमेव देश आहे की, ज्या देशात अगदी लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वाधिक आत्महत्या होत असल्याची ठळक नोंद एका अहवालात समोर आली आहे. अगदी शुल्लक कारणावरून किंवा लहानसहान गोष्टीवरून थोडेफार दुःख, किंचित अपयश व आलेल्या संकटांना घाबरून आत्महत्या करणाऱ्या माणसांचे प्रमाण आता दिवसेंदिवस वाढत चालले आहे. ही लोकशाही प्रधान देशासाठी अतिशय चिंताजनक व खेदाची बाब म्हणावी लागेल. त्यात शेतकरी, कष्टकरी, कामगार, मजूर व शिक्षण घेणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांचे म्हणजेच शालेय व महाविद्यालयीन मुला मुलींचे आणि सुशिक्षित बेरोजगारांचे प्रमाण अधिक असल्याचे एका आकडेवारीनुसार भारतात समोर आले आहे. ही बाब मानवतेच्या दृष्टीने समतावादी व लोकशाही प्रधान देशासाठी अतिशय धोक्याची घंटा समजली जात आहे. आजकालच्या युवकांना जराही संयम, धीर व आलेल्या संकटांना पचवण्याची क्षमता नसल्यामुळे आजकालची मुले जराही अपयश आले, आई-वडिलांनी रागावले, पत्नीने मनाविरुद्ध वागले किंवा पर पुरुषासोबत अनैतिक संबंध ठेवले म्हणून टोकाचे पाऊल उचलून आत्महत्या करत आहेत. नोकरीत किंवा परीक्षेत अपयश आल्यामुळे आत्ताची मुले मुली आलेल्या अपयशाचा व संकटाचा हिंमतीने सामना न करता नैराश्यातून व मानसिक तणावातून आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलून लाखमोलाचे अनमोल जीवन संपवत आहेत. आजकालच्या मुलांमध्ये आलेल्या संकटाला, अपयशाला व दुःखाला पचवण्याची व त्याच्यावर जिगरबाज बनून हिंमतीने तोंड देण्याची जबरदस्त क्षमता त्यांच्यात राहिली नाही. आत्ताची युवा पिढी अविचारी, असंयमी व तापट स्वभावाची आणि जराही सहनशीलता नसलेली उदयास आली आहे. कळत नकळतपणे जीवनात आलेल्या दुःखद व वाईट प्रसंगाला पचवण्याची क्षमता त्यांच्यात नसल्यामुळे ते अशा लहानसहान संकटांना घाबरून टोकाचे पाऊल उचलत आहेत. आणि स्वतःची जीवन यात्रा संपवून आई-वडिलांना, पत्नीला आणि मुलाबाळांना निराधार करत आहेत. घरच्यांना दुःख सागरात लोटून त्यांच्या मानसिकतेला जबरदस्त धक्का देत आहेत. आजकाल आत्महत्या करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वेगाने वाढत चालले आहे. आत्महत्या करणारे शाळकरी मुले व शेतकरी बांधव यांचा अधिक समावेश आहे. शाळकरी मुले आई-वडिलांच्या दबावाखाली शिक्षणाचे धडे गिरवत असतात. त्यांचे आई-वडील त्यांच्यावर भल्या मोठ्या अपेक्षा ठेवून त्यांच्या मानसिकतेवर दबाव आणतात. विद्यार्थ्यांचा कल कोणत्या क्षेत्रात आहे, त्यांची अभ्यास करण्याची क्षमता आणि त्याच्यातील शैक्षणिक धमक न ओळखता त्यांना डॉक्टर, इंजिनीयर, उच्चपदस्थ अधिकारी किंवा अभियंता होण्यासाठी त्यांच्या मागे सपाटा लावतात. म्हणजे त्यांच्या इच्छेविरुद्ध आवाक्याच्या बाहेर जाऊन नको तेवढ्या अपेक्षांचे ओझे लादून मोकळे होतात. विद्यार्थ्यांचे स्वप्न व आशा आकांक्षा वेगळ्या असतात परंतु आई-वडिलांच्या दबावामुळे व त्यांच्या दडपणामुळे विद्यार्थी मनाविरुद्ध शैक्षणिक क्षेत्र निवडतात, परिणामी त्यांना म्हणावे तेवढे यश मिळत नसल्यामुळे विद्यार्थी मानसिक तणावात जाऊन आई-वडिलांच्या भीतीपोटी म्हणा किंवा समाज काय म्हणेल या भीतीमुळे टोकाचे पाऊल उचलून स्वतःची जीवन यात्रा संपवतात. हे एवढ्यावरच सीमित नसून आजकालची मुले अगदी शुल्लक गोष्टीवरून सुद्धा आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहेत. आई-वडिलांनी रागावले, आई-वडिलांनी गाडी घेऊन दिली नाही, मनासारखा मोबाईल घेऊन दिला नाही, मनासारखी पत्नी मिळाली नाही, मुलीने लव्ह मॅरेज केले वडील आत्महत्या करत आहेत. एवढे शिकूनही नोकरी लागत नाही, दिवसेंदिवस वय वाढत चालले आहे आणि घरातील गरिबी संपुष्टात येत नाही म्हणून सुद्धा गरिबीला कंटाळून आत्महत्या केल्या जात आहेत. सध्या महाराष्ट्रात शेतकरी प्रचंड हालाखीचे जीवन जगत आहेत. जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी सध्या खूप अडचणीत आला आहे. त्याला भरपूर शेती असून देखील निसर्ग त्याच्यावर म्हणावी तेवढी कृपा करत नाही. एक तर वेळेवर पाऊस पडत नाही, आणि पडला तर अतिवृष्टी करून टाकतो. हातातोंडाशी आलेला घास निसर्गाच्या अतिवृष्टीमुळे जमीन दोस्त होऊन जातो. शेतकरी दुहेरी संकटात अडकला जातो. सावकाराचे कर्ज काढून त्याने शेतीसाठी खते व बी बियाणे खरेदी करून पेरणी केलेली असते. परंतु अतिवृष्टीमुळे संपूर्ण पिकाचा सत्यानाश झाल्यामुळे शेतकऱ्याच्या हाती काहीच लागत नाही. शेतकरी अतिशय चिंताग्रस्त व निराश होऊन जातो. सावकाराचे वाढते कर्ज, मुलाबाळांचे शिक्षण, उपवर मुलींचे लग्न आणि घर प्रपंच चालवण्यासाठी आर्थिक टंचाई हे त्याच्या डोळ्यासमोर तरळत असते. परिणामी उदास व निराश होऊन शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहेत. हे चित्र सध्या आपण सर्वत्र पाहत आहोत, वर्तमानपत्रांत व सोशल मीडियावर बघत आहोत. शाळकरी विद्यार्थ्यांनी व शेतकरी बांधवांनी आलेल्या संकटांना व अपयशांना न डगमगता व न घाबरता जिगरबाज बनून हिंमतीने त्याचा सामना करावा...आणखीन सावकाराचे कर्ज काढावे, लोन उचलावे, मित्रांना व नातेवाईकांना काही दिवसांसाठी आर्थिक मदतीची याचना करावी...तुमच्यावर आलेली बिकट वेळ ही खूप दिवस राहत नसते...काही दिवस शांत, निवांत व आनंदी रहा..कालांतराने तुमचेही दिवस बदलतील आणि तुमच्याही जीवनात आर्थिक भरभराट आणि आनंदाची मंगलमय पहाट उगवेल. पण आत्महत्या हा याच्यावर उपाय होऊच शकत नाही..इथे आत्महत्या करणाऱ्याला समाज कमी समजतो परंतु आलेल्या संकटावर, अडचणीवर, दुःखावर आणि अपयशावर खचून न जाता जिगरबाजपणे त्याच्यावर हिंमतीने मात करून जो पुढे जातो आणि यशाला काबीज करून आर्थिक परिस्थिती सक्षम करतो, त्याला समाज देखील मनःपूर्वक सलाम करतो. त्याच्या जिगरबाजपणाची वाहवा करतो. हल्ली देशात शेतकऱ्यांच्या नंतर तरुणांच्या आत्महत्या होण्याचे प्रमाण अधिक वाढले आहे. याचे कारण असे की, आजकालची तरुणाई व्यसनाच्या आहारी जाऊन स्वतःला व्यसनाच्या विखारी विळख्यात अडकवून टाकत आहे. दररोज विविध दारूचे नशाबाज व्यसन करून दारू त्यांच्या नसानसात भिणून गेली आहे. त्यांना दारू शिवाय चैनच पडत नाही. त्यांना वेळेवर दारू व गांजा मिळाला नाही तर त्यांची मनस्थिती नीट काम करत नाही, त्यांचे पूर्ण अंग थरथर कापते आणि ते उदास व निराश होतात. त्यांना दारू पिण्यासाठी आई-वडील सुद्धा कुठवर पैसा देतील? त्यांना सुद्धा कोणतेच काम करू वाटत नाही. दारू नसल्यामुळे त्यांना कोणासोबत बोलू वाटत नाही, ते सारखे निराश होऊन एकांतात राहतात. चिडचिडपणा करतात आणि स्वतःला वैतागून एक दिवस स्वतःचे अनमोल जीवन संपवतात. शरीरातील नसानसात दारू भिनल्यामुळे त्यांना वेळेवर दारू पाहिजेच आणि वेळेवर दारू नाही मिळाली तर ते टोकाचे पाऊल उचलतात. दारू पिण्यासाठी पैसे नसल्यामुळे आणि वेळेवर त्याला दारू मिळत नसल्यामुळे आजकालचे तरुण मनोरुग्ण होत आहेत आणि स्वतःचे जीवन संपवून टाकत आहेत. तसेच दहावी व बारावीची मुले बोर्ड परीक्षेत कमी गुण मिळाल्यामुळे किंवा नापास झाल्यामुळे निराश व उदास होऊन स्वतःचे जीवन संपवत आहे. नोकर भरतीच्या परीक्षेत एक दोन गुणांनी नंबर हुकला म्हणून काहीजण आत्महत्या करत आहेत. वेळेवर लग्न जुळत नाही, मनासारखे स्थळ मिळत नाही, अहोरात्र कष्ट करून देखील शेती चांगली पिकली नाही किंवा मनासारखी सुगी झाली नाही म्हणून बहुतांश शेतकरी आत्महत्या करत आहेत. ही समस्त भारतीयांसाठी चिंताजनक व खेदाची बाब आहे. पूर्वीची माणसे जीवनात कितीही अपयश आले, संकट आले किंवा दुःखाचा डोंगर कोसळला तरीही आत्महत्या करत नव्हते किंवा खचून जात नव्हते, उलट जोमाने कष्ट व परिश्रम करून परिस्थितीला पूर्ववत आणत होते. म्हणजे तेव्हाची माणसे जिगरबाज व खंबीर मनाचे होते. असेच म्हणावे लागेल. परंतु आजकालचा जमाना हळव्या मनाचा व हलक्या काळजाचा निपजला आहे. त्यांच्यातील जिगर मजबूत व भक्कम नसल्यामुळे त्यांना दुःख, अपयश व संकट पचवणे अवघड जात आहे. जिगरबाजपणे संकटावर मात करण्याचे धाडस त्यांच्या अंगी नसल्यामुळे आत्महत्येचे प्रमाण वाढण्याचे हे एकमेव कारण आहे. हे सत्य कोणालाही नाकारता येणार नाही. जाता जाता व्यसनी तरुणांना विनंती करतो की, बाबांनो, मी मान्य करतो की तुमचे व्यसन काही लवकरात लवकर सुटणे शक्य नाही. व्यसनाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी करत करत एक दिवस व्यसनाला कायमचा राम राम करावा..शेतकरी बांधवांना मनःपूर्वक विनंती करतो की, दादांनो तुमच्यावर कितीही कर्जाचा भार होऊ द्या, तुम्ही कितीही आर्थिक व नैसर्गिक संकटात सापडू द्या..फक्त तुमच्यात असलेली हिंमत न हारता जिगरबाज बनून आर्थिक व नैसर्गिक संकटावर हिंमतीने मात करा...सगळेच दिवस सारखे नसतात, सुखा नंतर दुःखाची आणि दुःखानंतर सुखाची मंगलमय पहाट उगवतच असते, फक्त जरा धीर धरा आणि जिगरबाज बनून येऊ घातलेल्या संकटावर हिंमतीने मात करा...

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो. ७४९८७१५६६१**

**पान १ वरुन**

## ग्रामीण भागातील ...

दिव्यांग ओळखपत्र देणे यांचा समावेश आहे. स्वम पंचायत हा दुसरा घटक असून, यात कर, पाणी पट्टी आणि थकबाकी वसुली तसेच स्वउत्पन्न वाढवणे यावर भर आहे. पुढे बोलतांना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले, जलसमृद्ध, स्वच्छ आणि हरित गाव हा तिसरा घटक आहे, ज्यात पाण्याचा ताळेबंद, शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, रेन वॉटर हार्वेस्टिंग, सौर ऊर्जा प्रकल्प, वृक्षलागवड, एकल वापर प्लास्टिक बंदी, आणि घनकचरा-सांडपाणी व्यवस्थापन यांचा समावेश आहे. मनरेगा आणि इतर योजनांशी अभिसरण हा चौथा घटक आहे, ज्यामध्ये विहीर पुर्नभरण, जलतारा, शेततळे, आणि शेतीशी निगडित कामे यांचा समावेश आहे. गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण हा पाचवा घटक आहे, ज्यामध्ये शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र, पशुवैद्यकीय केंद्र, स्मशानभूमी आणि धार्मिक स्थळांचे सुशोभीकरण यांचा समावेश आहे. उपजीविका विकास आणि सामाजिक न्याय हा सहावा घटक आहे, ज्यामध्ये घरकुल योजनांचे पूर्णत्व, बचत गट आणि लाखपती दीदी उपक्रम, शेतकरी उत्पादक संस्था, आणि टी.बी. व निमिया मुक्त गाव संकल्पना यांचा समावेश आहे. लोकसहभाग आणि श्रमदान हा सातवा घटक आहे, ज्यामध्ये रस्ते दुरुस्ती आणि पाणंद रस्ते निर्मिती यांना प्राधान्य आहे. नवीन्यपूर्ण उपक्रम हा आठवा घटक आहे, ज्यामध्ये ग्रामपंचायतींनी राबवलेले नाविन्यपूर्ण प्रकल्प समाविष्ट आहेत.

**आपण सर्व मिळून विकसित महाराष्ट्राचे स्वप्न साकार करू -आमदार बबनराव लोणीकर यांचे प्रेरणादायी आवाहन**

आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या भाषणात उपस्थितांना अभियानात सक्रिय सहभाग घेण्यासाठी प्रेरित केले. ते म्हणाले, ग्रामस्थांनो, सरपंचांनो आणि अधिकाऱ्यांनो, हे अभियान यशस्वी करण्यासाठी आपल्या सर्वांचा सहभाग आवश्यक आहे. आपल्या गावांना समृद्ध, स्वच्छ आणि आत्मनिर्भर बनवण्यासाठी एकत्र येऊया. १७ सप्टेंबरपासून सुरू होणारी ही चळवळ जालना जिल्ह्याच्या विकासाला नवी दिशा देईल. परतूर आणि मंठा तालुक्यांतील आपला सहभाग हा जिल्ह्याच्या प्रगतीसाठी महत्वपूर्ण आहे. मला विश्वास आहे की, आपण सर्व मिळून विकसित महाराष्ट्राचे स्वप्न साकार करू. आमदार बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनामुळे आणि कार्यशाळांमधील उत्साहपूर्ण सहभागामुळे जालना जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमध्ये या अभियानाबाबत मोठा उत्साह निर्माण झाला आहे. या कार्यशाळांनी ग्रामपंचायत प्रतिनिधींना आणि अधिकाऱ्यांना अभियानाच्या उद्दिष्टांबाबत स्पष्ट दिशा दिली आहे. येत्या काळात हे अभियान ग्रामीण विकासाला गती देईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. आमदार लोणीकर यांनी आपल्या नेतृत्वातून आणि प्रेरणादायी मार्गदर्शनातून या अभियानाला गावपातळीवर यशस्वी करण्यासाठी मजबूत पाया घातला आहे. या कार्यक्रम प्रसंगी परतूर येथील मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान कार्यशाळा वेळी व्यास पिठावर सरपंच संघटनेचे जालना जिल्हाध्यक्ष शत्रुघ्न कणसे, ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर माऊली शेजूळ, रमेश भापकर, विक्रम उफाड संपत टकले, संभाजी वारे, रविंद्र सोळंके, दिगंबर मुजमुले प्रदीप ढवळे शिवाजी पाईकराव गजानन लोणीकर सावता काळे छायाताई घोरबांड अर्जुन राठोड बंडू मानवतकर गजानन लिपणे , सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष किरण अंभोरे सिताराम राठोड, उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड तहसीलदार प्रतिभा गोरे गटविकास अधिकारी श्री राजेश तांगडे , प्रभाकर बनसावडे महिला व बाल विकास अधिकारी श्री कोळेकर गटविकास अधिकारी अशोक सोळंके डी बी काळे, बाबासाहेब चव्हाण, प्रशांत लाळे, श्रीमती गरड मॅडम यांची उपस्थिती होती.

तर मंठा येथील मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान कार्यशाळा वेळी सतीश निर्वळ, गणेश खवने, पंजाब बोराडे, अजय अवचार, नागेशराव घारे, अमोल मोरे, आनंद जाधव, दत्तराव कांगणे, प्रसादराव गडदे, विलास घोडके, रामकिसन बोडके, राजाभाऊ खराबे, माऊली गोंडगे, गणेशराव चव्हाळ, नवनाथ खंदारे, वसंत बागल, दत्ताराव खराबे. सोपानराव वायाळ, बंडूनाना खरात, रावसाहेब बाहेकर, गजानन शिंदे, बाबाजी जाधव. गुलाबराव राठोड. केजी राठोड. सुनील कांगणे, रामभाऊ सरकटे, विठ्ठलराव कदम. तानाजी शेंडगे, परमेश्वर शिंदे, श्रीदेव खरात, या बरोबर उपविभागीय अधिकारी डॉक्टर पद्माकर गायकवाड, तहसीलदार प्रतिभा गोरे, पीएसआय मळगे, मंठा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी गगनबोणे, गटशिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण यांच्यासह मंठा पंचायत समितीचे विस्तार अधिकारी ग्रामसेवक, मंडळ अधिकारी, तलाठी हजारो सरपंच ग्रामपंचायत सदस्य अंगणवाडी सेविका आशा वर्कर यासह महिला बचत गटांच्या सदस्य उपस्थित होत्या.

**ग्रामपंचायतीसाठी बहुस्तरीय पुरस्कार योजना**

**राज्यस्तरीय** प्रथम पुरस्कार ५ कोटी, द्वितीय पुरस्कार ३ कोटी, तृतीय पुरस्कार २ कोटी

**विभागस्तरीय** प्रथम पुरस्कार १ कोटी, द्वितीय पुरस्कार ८० लाख, तृतीय पुरस्कार ६० लाख

**जिल्हास्तरीय** प्रथम पुरस्कार ५० लाख, द्वितीय पुरस्कार ३० लाख, तृतीय पुरस्कार २० लाख

**तालुकास्तरीय** प्रथम पुरस्कार १५ लाख, द्वितीय पुरस्कार १२ लाख, तृतीय पुरस्कार ८ लाख

**विशेष पुरस्कार** (२) ५ लाख (प्रत्येकी)

**पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेसाठी बहुस्तरीय पुरस्कार योजना**

**पंचायत समिती - राज्यस्तरीय** प्रथम पुरस्कार २ कोटी, द्वितीय पुरस्कार १ कोटी, तृतीय पुरस्कार १.२५ कोटी

**पंचायत समिती - विभागस्तरीय** प्रथम पुरस्कार १ कोटी, द्वितीय पुरस्कार ७५ लाख, तृतीय पुरस्कार ६० लाख

**जिल्हा परिषद - राज्यस्तरीय** प्रथम पुरस्कार ५ कोटी, द्वितीय पुरस्कार ३ कोटी, तृतीय पुरस्कार २ कोटी

**ग्रामपंचायत निवड प्रस्ताव आणि मूल्यमापनाची कालमर्यादा**

ग्रामपंचायतींच्या निवड प्रक्रियेसाठी स्वयंमूल्यमापन आणि प्रस्ताव सादर करण्याची कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. ही प्रक्रिया पारदर्शकपणे आणि वेळेत पूर्ण होण्यासाठी सर्व ग्रामपंचायतींनी खालील कालमर्यादेचे पालन करणे आवश्यक आहे.

ग्रामपंचायत स्तरावर स्वयंमूल्यमापन करून तालुका स्तरीय समितीकडे अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख १० जानेवारी आहे. जिल्हास्तरीय समितीकडे निवड प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख २७ जानेवारी आहे. विभागस्तरीय समितीकडे निवड प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख १६ फेब्रुवारी आहे, तर राज्यस्तरीय समितीकडे निवड प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख २८ फेब्रुवारी आहे. मूल्यमापन प्रक्रियेसाठी तालुका स्तरावर ११ जानेवारी ते २६ जानेवारी, जिल्हा स्तरावर २८ जानेवारी ते १५ फेब्रुवारी, विभाग स्तरावर १७ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी आणि राज्य स्तरावर मार्च महिन्यात मूल्यमापन पूर्ण होईल. सर्व ग्रामपंचायतींनी वेळेत स्वयंमूल्यमापन करून आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करावेत. प्रस्ताव सादर करताना माहिती पूर्ण आणि अचूक असावी. अधिक माहितीसाठी किंवा शंकांचे निरसन करण्यासाठी संबंधित तालुका, जिल्हा किंवा विभागीय समितीशी संपर्क साधावा. ही प्रक्रिया ग्रामपंचायतींची कार्यक्षमता वाढवण्यासाठी आणि त्यांच्या विकासकामांचे योग्य मूल्यमापन करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

## महावितरण कर्मचाऱ्यांची ...

यांच्यासमोर दिले. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये असलेली उद्दाम वृत्ती स्पष्टपणे दिसून येते.

या घटनेची माहिती पत्रकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमीर खान यांना मिळाल्यावर, त्यांनी इतर पत्रकारांसमवेत खिल्लारे यांची भेट घेतली. मात्र, खिल्लारे यांनी या प्रकरणात कोणतीही मदत न करता, 'तुम्हाला जे काही करायचे ते करा आणि इथून निघून जा,' असे बोलून पुन्हा एकदा पत्रकारांचा अपमान केला. यानंतर, सर्व पत्रकार महावितरणच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना भेटले आणि त्यांना सर्व प्रकारची माहिती दिली.

या गंभीर घटनेनंतर, इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनने जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन सादर केले आहे. यात उपकार्यकारी अभियंता भरत खिल्लारे आणि कर्मचारी राहुल उघडे, निकम, मोरे, व संबंधित महिला कर्मचारी यांना तात्काळ चौकशी करून बडतर्फ करण्याची मागणी केली आहे. जर २५ सप्टेंबर २०२५ पर्यंत दोषींवर कारवाई झाली नाही, तर सर्व पत्रकार एकदिवसीय आंदोलन करतील, असा इशाराही संघटनेने दिला आहे.

या घटनेमुळे महावितरणमधील काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा ग्राहकांप्रती असलेला बेजबाबदार आणि उद्दाम दृष्टीकोन पुन्हा एकदा समोर आला आहे.

यावेळी इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनचे जालना जिल्हाध्यक्ष आमेर खान, प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, सुनील भारती, सुयोग खर्डेकर, सय्यद अफसर, सुनील खरात, शरद सोनटक्के, शेख मुजिबुद्दीन, सचिन सर्वे, बासित बेग, सुहास वैद्य, शेख शकील, शेख सलीम, आकाश माने, राहुल मुळे, आरेफ सय्यद, साहिल पाटील, विलास गायकवाड, योगश काकफळे, सय्यद महेबुब यांच्यासह पत्रकारांची उपसिथती होती.

## पोलीसांनी गुन्ह्यांचा ...

पथक स्थापन करण्यात आले आहे. या पथकाने जनतेकडून माहिती घेण्यासाठी एक गोपनीय मोबाईल क्रमांक ७८४३०५१०२६ जाहीर केला आहे. या क्रमांकावर नागरिकांनी अमली पदार्थांशी संबंधित माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**पोलिसिंग आणि तंत्रज्ञानाचा वापर**

या बैठकीत उपविभागीय पोलीस अधिकारी आणि प्रभारी अधिकाऱ्यांना जास्तीत जास्त गावांना भेटी देण्यास सांगण्यात आले. प्रत्येक गावात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी जनजागृती करण्याचे निर्देशही देण्यात आले.

यासोबतच, मा. विशेष पोलीस महानिरीक्षकांच्या हस्ते जालना पोलिसांच्या अधिकृत वेबसाईटवर (https://jalnapolice.gov.in/) Lost and Found या नवीन टॅबचे अनावरण करण्यात आले. यामुळे आता नागरिक त्यांचे हरवलेले आधार कार्ड, पॅन कार्ड, वाहन परवाना किंवा इतर कागदपत्रे ऑनलाईन नोंदवू शकतील, ज्यामुळे त्यांना पोलीस ठाण्यात जाण्याची गरज राहणार नाही.

तसेच, पासपोर्ट आणि ई-प्रणालीचे काम अधिक सोयीचे करण्यासाठी जालना पोलीस दलातील सर्व पोलीस ठाणे आणि शाखांना एकूण २५ स्कॅनर, २१ मोबाईल टॅब, ४ संगणक आणि १ लॅपटॉपचे वाटप करण्यात आले.

या आढावा बैठकीला जालना पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांच्यासह जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी आणि सर्व शाखा प्रमुख उपस्थित होते.

## भाजपा जिल्हाध्यक्ष ...

केली.

**नागरिकांच्या मागण्यांवर लक्ष केंद्रित**

या भेटीत, भास्कर दानवे यांनी जालना शहरातील नागरिकांच्या विविध मागण्या व गरजांकडे पंकजाताईंचे लक्ष वेधले. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रकल्पांमुळे नागरिकांना होणारा त्रास त्यांनी मांडला. यावर, पंकजाताई मुंडे यांनी तातडीने संबंधित विभागांना आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले आणि निधी उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला.

**भविष्यातील विकास योजनांवर भर**

या बैठकीत केवळ सध्याच्या प्रकल्पांवरच नव्हे, तर जालना शहराच्या भविष्यातील विकासासाठी आवश्यक असलेल्या नवीन योजनांवरही चर्चा झाली. शहराची वाढती लोकसंख्या आणि गरजा लक्षात घेऊन दीर्घकालीन विकासासाठी नियोजन करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. ही भेट जालना शहराच्या विकासाला गती देणारी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय परभणी येथे जिल्हास्तरीय निबंध स्पर्धा संपन्न



**परभणी । प्रतिनिधी -** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि वाड्.मय विभाग, कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय परभणी व यांच्या संयुक्त विद्यमाने परभणी जिल्हास्तरीय निबंध स्पर्धा हैदराबाद मुक्तिसंग्राम दिन आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड वर्धापन दिनानिमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन दिनांक ११ /09 / २०२५ रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले होते.

या स्पर्धेसाठी उच्च शिक्षणातील संधी आणि आव्हाने तसेच मराठवाड्यातील उच्च शिक्षण भविष्यकालीन दिशा हे विषय ठेवण्यात आले होते . स्पर्धेसाठी परभणी जिल्ह्यातील एकूण सोळा स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेसाठी प्रा. डॉ.दत्ता शिंदे संत तुकाराम महाविद्यालय, परभणी प्रा. डॉ.निलेश लोंढे ज्ञानोपासक महाविद्यालय ,परभणी परिक्षक म्हणून उपस्थित होते. स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाला सौ. वसुंधराताई जामकर ( सदस्य, नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था,परभणी) यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लाभली. अध्यक्षस्थानी प्र- प्राचार्य डॉ. संगीता आवचार यांची उपस्थिती लाभली. परिक्षक डॉ .दत्ता शिंदे, डॉ.निलेश लोंढे आणि वाड्.मय मंडळातील प्र- प्राध्यापक उपस्थित होते.

स्पर्धेचे उदघाटन प्रसंगी स्वामी रामानंद तीर्थ आणि कै.सौ.कमलताई जामकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सदरील स्पर्धेत कु.अनुराधा कुलथे श्री.शिवाजी महाविद्यालय,परभणी ही सर्व प्रथम.अमरदीप तुपसुंदरे नितीन महाविद्यालय,पाथरी व्दितीय. तर शिवराज कुटे स्वारातीम विद्यापीठ परिसर परभणी तृतीय क्रमांकाचा मानकरी ठरला.मान्यवरांचे हस्ते प्रमाणपत्र व मानचिन्ह देवून विजेत्यांना सन्मानित करण्यात आले.


कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रा.डॉ. आशा गिरी यांनी केले.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वैद्यकीय मदत कक्ष जिल्हा अध्यक्ष पदी दत्ता अंभूरे

**परतूर । प्रतिनिधी -** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वैद्यकीय मदत कक्ष जिल्हा अध्यक्ष जालना दत्ता अंभुरे यांची निवड करण्यात आली असून, या निवडीमुळे जिल्ह्यातील राजकारणाला नवा वेग मिळणार आहे. कालच उपमुख्यमंत्री अजितदादा पवार तसेच प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे. जितेंद्र सुरेश सातव. प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र मा.आमदार.सुरेशकुमार जेथलिया मा .युवानेते नितीन भैय्या जेथलिया राज्ययांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड जाहीर करण्यात आली.

दत्ता अंभुरे आरोग्य धूत समाजसेवक व पत्रकार आहेत. त्यांच्या सक्रिय कार्यामुळे व प्रामाणिक स्वभावामुळे त्यांना जिल्ह्यातील सर्वच पातळ्यांवर मोठा जनाधार लाभला आहे. पक्षश्रेष्ठींनी दाखविलेला विश्वास ही त्यांच्यावरची मोठी जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हाध्यक्षपदी सूत्र स्वीकारल्यानंतर पत्रकारांशी बोलताना दत्ता अंभुरे म्हणाले की,वैद्यकीय मदत कक्ष पक्षाने दिलेली जबाबदारी मी प्रामाणिकपणे पार पाडणार आहे. जिल्ह्यातील सामान्य जनतेला न्याय मिळावा, त्यांच्या प्रश्नांना योग्य तो आवाज मिळावा यासाठी सतत लढा देणार



आहे. गावपातळीपासून ते जिल्हास्तरापर्यंत पक्षाचे काम बळकट करून राष्ट्रवादी काँग्रेसला वैद्यकीय मदत कक्ष आणखी मजबूत करणे हे माझे ध्येय आहे. त्यांच्या या निवडीचे स्वागत जिल्ह्यात सर्वत्र होत असून गावोगाव, तालुकास्तरावर तसेच कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक सामाजिक संघटना, कार्यकर्ते व नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

दत्ता अंभुरे यांच्या नेतृत्वामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला वैद्यकीय मदत जालन्यात नवे बळ मिळणार असून आगामी काळात पक्षाची ताकद वाढविण्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरणार, असा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे.

## दै. मराठवाडा साथीचे संपादक सतिश बियाणी यांचे निधन

**परळी -** येथील दै. मराठवाडा साथीचे संपादक सतिश मोहनलाल बियाणी यांचे आज अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ५७ वर्षे होते. कै. सतिश बियाणी यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त केली जात आहे. गेल्या काही दिवसापासून ते आजारी होते. त्यांच्यावर रुग्णालयात उपचारही सुरू होते. शुक्रवार (दि १२) रोजी दुपारी ४ वाजण्याचे सुमारास त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

# हैदराबाद गॅझेट लागू करा; गोरबंजारा समाजाची मागणी

पारंपारिक वेशभुषा अन् ट्रक्टर, दुचाकींसह जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा



**जालना । प्रतिनिधी -** बंजारा समाजाचा न्यायासाठी मोर्चा धडकणार असून हैदराबाद गॅझेट लागू करून एस.टी. आरक्षण देण्याच्या मागणीसाठी १५ सप्टेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर संपूर्ण बंजारा समाजाचा मोर्चा धडकणार आहे. त्या अनुषंगाने समाजातील शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले.

दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की,गोरबंजारा, लमाण, लंबाडी समाजाचा इतिहासच सांगतो की निजाम काळापासून १९४८ पर्यंत हैदराबाद गॅझेटमध्ये या समाजाला जमातीचा दर्जा मिळाला होता. आंध्र-तेलंगणामध्ये त्याच आधारावर आजही आरक्षण आहे, पण महाराष्ट्रातील समाज मात्र राज्य पुनर्रचनेच्या फटक्यामुळे आरक्षणापासून वंचित राहिला. आयोगांचे सकारात्मक अहवाल असूनही, पुरावे असूनही, आजवर अन्यायच झाला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

मराठा समाजासाठी हैदराबाद गॅझेट लागू होऊ शकतं, तर गोरबंजाऱ्यांसाठी का नाही? हा प्रश्न घेऊन बंजारा समाज १५ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर न्यायाचा बिगुल फुंकणार असून या मोर्चामध्ये बंजारा समाज पारंपारिक वेशभूषामध्ये माता भगिनींसह उपस्थित राहणार असून ट्रॅक्टर, मोटरसायकल यासह इतर वाहन सोबत घेऊन बंजारा समाज मोठ्या प्रमाणात जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाटोदा येथील विद्यार्थ्यांना आचार्य विनोबा भावे जयंतीदिनी ११ सप्टेंबर रोजी मोफत शालेय गणवेश योजनेअंतर्गत दुसऱ्या टप्प्यातील गणवेश वाटप करण्यात आले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डी.एस.मिसाळ व सर्व सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापक संतोष तोटेवाड, श्री जी.वाय.वानोळे, श्री देविदास मामीलवार, श्रीमती अनुजा पाटील व श्रीमती गीता बरसाले यांच्या उपस्थितीत गणवेश वाटप करण्यात आले. नवीन गणवेश मिळाल्याने विद्यार्थी आनंदून गेले होते.



# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस सेवा सप्ताह म्हणून साजरा करा

भाजपा जिल्हा कार्यशाळेत प्रदेश सरचिटणीस संजय कौडगे यांचे आवाहन



**जालना । प्रतिनिधी -** भारत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी वाढदिवस असून त्यानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्याचे आहवान भाजपाचे प्रदेश सरचिटणीस तथा मराठवाडा संघटनमंत्री संजयजी कौडगे यांनी भाजपा जालना ग्रामीण जिल्हा कार्यशाळेत केले.

भाजपा जिल्हा जालना ग्रामीणची कार्यशाळा बुधवारी दिनांक १० सप्टेंबर २०२५ रोजी भाजपा बदनापूर कार्यालयात भाजपा जिल्हाध्यक्ष आ. नारायणराव कुचे यांच्या अध्यक्षेखाली संपन्न झाली. या कार्यशाळेस भाजपा प्रदेश चिटणीस राहुल भैय्या लोणीकर, माजी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, जिल्हा सरचिटणीस अनिलराव कोलते, गोविंद ढेंबरे गणेश ठाले, रमेश भापकर भाजपा जिल्हा उपाध्यक्ष वीरेंद्र धोका, गणेश खवणे, पद्माकर जऱ्हाड,शंकर लहामंगे, शिवाजीराव बोबडे, परीक्षीत शिंदे महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष संध्याताई देठे, गणेश बापू फुके, तुकाराम जाधव, भगवान मात्रे, संतोष लोखंडे, बाबासाहेब कोलते, हरिचंद्र शिंदे, डॉ. राजू साळवे, राजेश चव्हाण, एकनाथ मोरे,वसंतराव जगताप,सत्यनारायण गिल्डा,प्रदीप साबळे,शोभाताई देशमुख, द्वारकाताई मेहत्रे आदीची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी भाजपा जिल्हा कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना संजयजी कौडगे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर महात्मा गांधी जयंती पर्यंत विविध सामाजिक उपक्रम साजरे करून १७ सप्टेंबर रोजी स्वच्छता अभियान हे सार्वजनीक दवाखाना, मंदिर, बौद्ध विहार, शाळा अशा विविध ठिकाणी स्वच्छतेचा कार्यक्रम राबवून मोदीजींच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त जिल्ह्यातील प्रत्येक मंडळात रक्तदान शिबिरे आयोजित करून एक पेड माँ के नाम हा कार्यक्रम जिल्ह्यात राबवून सेवा सप्ताह साजरा करण्याचे आवाहन केले.

यावेळी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतांना भाजपा जिल्हाध्यक्ष आ. नारायणराव कुचे म्हणाले की, जालना जिल्ह्यात प्रत्येक मंडळामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या वाढदिवस हा सेवा सप्ताह म्हणून साजरा करण्यासाठी ज्याप्रमाणे मुख्यमंत्री ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस यांचा वाढदिवस सेवा सप्ताह म्हणून साजरा केला त्याचप्रमाणे जिल्ह्यामध्ये भाजपा मंडळ प्रमुखांनी व जिल्हा पदाधिकारी यांनी सेवा सप्ताह म्हणून साजरा करावा, आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर परिषद निवडणुकीत महायुतीच्या ताब्यात घेण्यासाठी आतापासून भाजपाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कामाला लागावे तसेच शासन स्तरावर मुख्यमंत्री पंचायतराज योजनेच्या माध्यमातून कार्यक्रम सुरू आहे.

त्यामध्ये सुद्धा पदाधिकाऱ्यांनी सहभागी व्हावे पुढचे दिवस हे आता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे असून कोणत्याही पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी हलगर्जीपणा न करता सेवा सप्ताहात काम करावे, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी देशांमध्ये जी. एस. टी. मध्ये सामान्य नागरिकांसाठी मोठ्या प्रमाणात सुधारणा केली आहे त्यामुळे केंद्र व राज्य शासनाच्या जनकल्याणकारी योजना ग्रामीण भागातील जनतेपर्यंत पोहोचून आगामी निवडणुका जिंकण्यासाठी कामाला लागण्याचे आवाहन केले आहे. यावेळी भाजपा प्रदेश चिटणीस राहुल लोणीकर म्हणाले की, भाजपा सत्तेत नसतांनाही जनतेच्या प्रश्नावर भाजपाचे पदाधिकारी आक्रमक होते भाजपा विरोधी पक्षात होती तरी जनतेच्या प्रश्नावरची चळवळ थांबली नाही आता तर आपण केंद्रात व राज्यात सत्तेत आहोत त्यामुळे सत्तेच्या माध्यमातून सेवा पंधरवडा अभियान यशस्वी करून जालना जिल्हा परिषद भाजपा ३५ च्या वर जागा जिंकणार असल्याचे विश्वास राहुल लोणीकर यांनी व्यक्त केला.

**झाडे लावा झाडे जगवा**

# सातारा गॅझेट,हैदराबाद गॅझेट व विश्वकर्मा योजना; यात कलार-कलाल समाज पारंपरिक व्यवसायाठी नियमानुसार अनुकूल

मराठा समाजाला हैदराबाद गॅझेट व सातारा गॅझेट नुसार आरक्षण देण्याचे आश्वासन सरकारने दिले आहे आणि त्या पध्दतीने कार्य सुरू आहे. याच आधारावर बंजारा समाजाने सुध्दा आरक्षणामध्ये उडी घेतली असून बंजारा समाजाला एस टी संवर्गात आरक्षण द्यावे यासाठी कंबर कसली आहे. कारण आज वाढता शिक्षणाचा खर्च, वाढती महागाई व बेरोजगारी यामुळे सर्वच समाजाच्या गरीब व मध्यमवर्गीयांचे कंबरडे मोडले असुन हताश झाले आहेत.त्यामुळे आज बंजारा समाजासह अनेक समाज हैदराबाद गॅझेट व सातारा गॅझेटच्या माध्यमातून आरक्षण किंवा आपला पारंपरिक व्यवसाय मिळण्याच्या दृष्टीने धडपड सुरू आहे. महत्वाचे म्हणजे सातारा गॅझेट ब्रिटिश काळातील (१८२०-१८३०) सातारा प्रांतातील जमीन, शेती, व्यवसाय, जाती आणि महसूल यांच्या नोंदीचा ऐतिहासिक पुरावा कलार-कलाल समाजासाठी महत्वाचा ठरेल. त्या अनुषंगाने हैदराबाद गॅझेट आणि सातारा गॅझेट म्हणजे ब्रिटीश काळातील एक सरकारी राजपत्र आहे. या गॅझेटमध्ये मराठा समाजाची कुणबी मराठा अशी नोंद आहे. त्याचप्रमाणे कलार-कलाल समाज संपूर्ण भारतात ताडीच्या (दारूच्या) व्यवसायासाठी सर्वत्र प्रचलित आहे. सातारा गॅझेट व हैदराबाद गॅझेटमध्ये हैदराबाद संस्थानातील १८८२च्या जनगणनेत कुणबी मराठा नोंद आहे म्हणजेच कलार -कलाल समाजाची पारंपरिक व्यवसायाची नोंद नक्कीच असायला हवी. शेती करणारे म्हणजे कुणबी मराठा, असा गॅझेटमध्ये उल्लेख आहे. म्हणजेच (दारूचा) ताडीचा व्यवसाय करणारे कलार-कलाल असा उल्लेख असायलाच पाहिजे. सरकार जर १८८२ म्हणजे निजामकालीन दस्तऐवज म्हणजे सातारा गॅझेट किंवा हैदराबाद संस्थानाच्या काळातील सरकारी राजपत्र गृहीत धरून आरक्षण देत असेल तर, सरकारने कलार-कलाल समाजाचा पारंपरिक (मद्य) व्यवसाय समाजाला द्यायलाच पाहिजे. यात यत्किंचितही पुराव्यांची गरज नाही. कारण मराठा समाजाला आरक्षण देवतांना स्वतंत्रपुर्व काळापासूनचा विचार केला आहे.त्याच आधारे कलार-कलार समाज सरकारला मागणी करते की, कलार-कलाल समाजाचा पारंपरिक मद्य व्यवसाय स्वतंत्रपुर्व काळापासूनचा आहे आणि १९४६ पर्यंत संपूर्ण भारतात मद्य व्यवसाय हा कलार-कलाल समाजाचा पारंपरिक व्यवसाय होता.परंतु १९४७ नंतर मद्य व्यवसायावर राजकीय पुढाऱ्यांनी आपली पकड मजबूत केली व १९४७ पासून तर आतापर्यंतच्या देशातील संपूर्ण सरकारांनी व राजकीय पुढाऱ्यांनी कलार-कलाल समाजाचा पारंपरिक मद्य व्यवसाय हिसकावला.त्यामुळे कलार-कलाल समाजामध्ये बेरोजगारीचे व गरीबीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले. करीता राज्यातील संपूर्ण समाज महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेच्या माध्यमातून सरकार सावधान करते की मराठ्यांच्या आरक्षणासाठी ज्याप्रमाणे निजामकालीन गॅझेटचा विचार केला त्यांच्या आधारे सरकारने संपूर्ण कलार-कलाल समाजाला मद्य व्यवसायाचे परवाणे ताबडतोब देण्याचा विचार करावा अन्यथा आम्हालाही रस्त्यावर उतरावे लागेल. निजाम महाराष्ट्रात १७२४ पर्यंत होते म्हणजे आज त्या गोष्टीला जवळपास ३०१ वर्षे पुर्ण झालीत.परंतु कलार-कलाल समाजाचा पारंपरिक व्यवसाय हा पीढोनपिढ्या म्हणजे राजे-महाराज्यांपासुन सुरू होता.परंतु स्वतंत्र मिळाल्यानंतर गेल्या ७८ वर्षात या व्यवसायाचे संपूर्ण भारतात राजकारण झाले. कलाल -कलार समाज आर्थिकदृष्ट्या मागासलेला आणि गरीब आहे.त्यामुळे समाजबांधवांना अनेक कठीण परिस्थितीचा सामना करावा लागत असल्यामुळे समाजाच्या उत्थानासाठी पारंपरिक (मद्य) हक्काचा व्यवसाय मिळणे अत्यंत गरजेचे आहे.त्यामुळे सातारा गॅझेट, हैदराबाद गॅझेट व विश्वकर्मा योजनेअंतर्गत कलाल-कलार समाजाचा पारंपरिक व्यवसाय मद्य (दारूचा व्यवसाय) सरकारने नियमानुसार परत करावा. सरकारमार्फत मद्य व्यवसायाची पहल सुध्दा सुरू आहे. राज्यात दारूच्या दुकानांची संख्या वाढविण्याचा सरकारचा विचार आहे. परंतु यात पहिला अधिकार कलाल-कलार समाजाला द्यायला हवा. राज्यात दारू विक्रीच्या दुकानांचे नवीन परवाने देणे १९७३ पासून बंद असतांना आता दारू उत्पादक कंपन्यांना नवीन विक्री परवाने देण्याचे उत्पादन शुल्क विभागाने प्रस्तावित केले आहे. उत्पादन शुल्क वाढीसाठी हा प्रस्ताव उपमुख्यमंत्री व वित्तीय मंत्री अजित पवार यांच्याकडे दिला आहे. याचे कलार समाजाने स्वागतच केले. आता दारू उत्पादक कंपन्यांना प्रत्येक जिल्ह्यात किरकोळ दारू विक्रीचे एक दुकान उघडण्यास मुभा देण्याचे प्रस्तावित आहे. दारूच्या दुकानांचे परवाने वाढविताना व वाटप करतांना सरकारने विश्वकर्मा योजनेअंतर्गत व पारंपरिक व्यवसाया अंतर्गत फक्त कलाल-कलार समाजाचा विचार करावा. आणि त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पारंपरिक व्यवसायाचा दुजोरा देवून विश्वकर्मा योजने अंतर्गत पारंपरिक व्यवसायवर प्रधानमंत्र्यांनी भर दिला आहे. त्याचं अनुषंगाने सरकारने नवीन परवाने देताना फक्त कलाल-कलार समाजाच्या पारंपरिक(मद्य) व्यवसायाचा गांभीर्याने विचार करावा. प्रधानमंत्री यांनी अमलात आणलेल्या विश्वकर्मा योजनेअंतर्गत व मराठा समाजाला देण्यात येणारे सातारा गॅझेट व हैदराबाद गॅझेट नुसार आरक्षण या संपूर्ण गोष्टींचा विचार करून पारंपारिक व्यवसायाचा विचार केला तर महाराष्ट्र सरकारला पारंपारिक व्यवसायाच्या दृष्टीकोणातुन कलाल-कलार समाजाला बाजूला सारता येणार नाही ही बाब राज्य सरकारने लक्षात ठेवली पाहिजे. पुर्वी देशात करोडोंच्या संख्येने समाजबांधव ताडीचा व्यवसाय करायचे कालांतराने ताडीच्या व्यवसायाचे रूपांतर मद्य व्यवसायामध्ये झाले.कलाल-कलार समाज हा मुळातच आदिवासी आणि मागासलेला समाज आहे. कलार समाजाचा व्यवसाय मद्य बनवून विकने हा होता यावरच समाजबांधवांची उपजिविका होती.परंतु स्वतंत्र आंदोलनात दारूचा(मद्यचा) विपरीत परिणाम होवू नये.यासाठी महात्मा गांधींनी २४ में १९३४ रोजी कलाल-कलार समाजबांधवांना आग्रह केला की आपल्याला स्वातंत्र पाहिजे असेल तर स्वतंत्र मिळेपर्यंत आपल्या पारंपारिक व्यवसायाचा त्याग करावा लागेल.कारण याचा आंदोलकांवर विपरीत परिणाम होवू शकतो. त्यामुळे संपूर्ण भारतातील करोडो समाज बांधवांनी महात्मा गांधींच्या आदेशाचे पालन करून आपल्या पारंपरिक व्यवसायावर बहिष्कार टाकला व स्वतंत्र लढ्यात उडी घेतली. कलाल- कलार समाजाची दारूबंदी फक्त स्वतंत्रपुर्व काळापर्यंतच होती. स्वतंत्र मिळाल्यानंतर कलार-कलाल समाजाने आपला व्यवसाय पुन्हा पुर्ववत सुरू केला.परंतू हा व्यवसाय अत्यंत लाभदायक आहे असे राजकीय पुढाऱ्यांच्या व पुंजीपतींच्या लक्षात आले आणि कलाल-कलार समाजाच्या पारंपारिक व्यवसायाचे राजकारण झाले व तेव्हापासून लायन्स (परवाना) पध्दती अमलात आली. अशा परिस्थितीत कलाल-कलार समाजाला सरकारने फक्त १ टक्के दारूचे परवाने दिले व ९९ टक्के परवाने राजकीय पुढारी,त्यांचे नातेवाईक व पुंजीपती यांना परस्पर वाटुन दिले आणि कलाल-कलार समाजाचा विश्वासघात झाला.परंतु आता सरकारने सातारा गॅझेट व हैदराबाद गॅझेट म्हणजे हैदराबाद संस्थानाच्या काळातील एक सरकारी राजपत्राचा आधार घेऊन सरकारने कलार-कलाल समाजाचा पारंपरिक मद्य व्यवसायाचे परवाणे ताबडतोब द्यावेत अन्यथा महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना रस्त्यावर उतरल्या शिवाय रहाणार नाही.

**रमेश लांजेवार, राज्य प्रवक्ता, महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना, मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर.**

# कोविड काळात गाव पातळीवर होमिओपॅथी डॉक्टरांनी दिलेली सेवा उल्लेखनीय - आ. लोणीकर

## एफडीएच्या परिपत्रकावरील स्थगिती उठवली; होमिओपॅथी डॉक्टरांनी मानले लोणीकरांचे आभार

**परतूर । प्रतिनिधी -** मंत्रिमंडळाने दि.०९ जानेवारी २०१४ रोजी मंजुरी देवून राज्यातील होमिओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथी उपचार करण्याची परवानगी व एमबीबीएस कॉलेजमध्ये एक वर्षाचा सीसीएमपी कोर्स सुरु केलेला होता. जुन २०१४ या अधिवेशनामध्ये याला विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाने मंजुरी दिलेली आहे. यामध्ये होमिओपॅथिक प्रॅक्टिशनर ऍक्ट १९६० मध्ये बदल करत होमिओपॅथी डॉक्टरांना एमबीबीएस कॉलेजमध्ये एक वर्षाचा सीसीएमपी कोर्स करून ऍलोपॅथीची परवानगी देण्यात आली होती. दि. १५ जुलै २०२५ पासून सीसीएम पी धारक होमिओपॅथिक डॉक्टरांना महाराष्ट्र वैद्यक परिषद मध्ये स्वतंत्र नोंदणी देण्यात येणार होती परंतु राज्य सरकारने अचानक निर्णय घेत सदरील नोंदणी व एफडीएचे परिपत्रक रद्द केले होते. मंठा येथील होमिओपॅथि डॉक्टर च्या वतीने आमदार बबनराव लोणीकर यांना निवेदनाद्वारे परिपत्रकाला दिलेली स्थगिती उठवण्यासंदर्भात विनंती केली होती. ती स्थगिती ५ सप्टेंबर २०२५ रोजी उठवण्यात आली असून महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल मुंबई यांनी ११ सप्टेंबर २०२५ रोजी परिपत्रक काढून सदरील डॉक्टरांना आपली नोंदणी करण्यासंदर्भात सुचित केले असल्याची माहिती देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली

पावसाळी अधिवेशनादरम्यान आमदार बबनराव लोणीकर यांनी पाठपुरावा करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दोन वेळा भेट घेऊन होमिओपॅथी डॉक्टरांचा विषय सविस्तरपणे मांडला होता. लोणीकरांच्या या मागणीला प्रतिसाद देत महाराष्ट्र सरकारने सदरील परिपत्रकावर दिलेली स्थगिती उठवण्यात आली असल्याचे आमदार लोणीकर यांनी स्पष्ट केले. सोबतच महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल ऍक्ट १९६५ मध्ये सुधारणा करत जे होमिओपॅथी डॉक्टर्स एमबीबीएस कॉलेजमधून एक वर्षाचा सीसीएमपी कोर्स पुर्ण करतील त्यांच्यासाठी शेड्युल २८ अंतर्गत स्वतंत्र नोंदणी पुस्तिका ठेवण्यात येणार आहे. दि. ०१ जुलै २०१४ पासून हा कायदा राज्यामध्ये मंजूर झाला होता आणि दि. ०८ जुलै २०१४ रोजी राजपत्रांमध्ये हा कायदा प्रसिध्द झाला होता, ही बाब आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनास आणून दिली होती.



सदरील परिपत्रकावर स्थगिती आणणे हा राज्यातील लाखो होमि ओपॅथी डॉक्टरांवरती मोठा अन्याय आहे या भावनेतून होमिओपॅथिक डॉक्टरांनी दि.१६ जुलै २०२५ रोजी आझाद मैदान मुंबई येथे उपोषण देखील करण्यात आले होते. डॉक्टरांच्या संपामुळे ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा विस्कळीत झाली होती. कोविड काळात याच डॉक्टरांनी ग्रामीण भागात आपल्या जीवाची परवा न करता रुग्ण सेवा दिलेली होती आणि आजही ग्रामीण भागात रुग्ण सेवा देण्यासाठी होमिओपॅथिक डॉक्टर सर्व पुढे आहेत. त्यांच्या अभ्यासक्रमाम ध्ये जेवढा ऍलोपॅथी चा विषय घटक शिकवला जातो किंवा ते शिकलेले आहेत तेवढ्याच औषधांची परवानगी ते मागत आहे ती त्यांना देण्यात यावी. अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, अजित दादा पवार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश अबीटकर यांच्याकडे पावसाळी अधिवेशनादरम्यान केली होती.

कोविड काळात ज्या डॉक्टरांनी भीतीपोटी प्रॅक्टिस बंद करण्याचा निर्णय घेतला होता त्या डॉक्टरांना सरकारने नोटीस बजावून तुम्ही रुग्णसेला का देत नाही असे विचारत त्यांचे लायसन्स रद्द करण्यात येईल अशा प्रकारच्या नोटीस दिलेल्या होत्या. मग जेव्हा आवश्यकता आहे तेव्हा प्रॅक्टिस करा म्हणून सरकार नोटीस देणार, आणि होमि ओपॅथिक डॉक्टरांच्या हक्काचे आपल्याच सरकारने निर्णय घेतलेले परिपत्रक पुन्हा आपलेच सरकार रद्द करणार हा महाराष्ट्रातील लाखो होमिओपॅथिक डॉक्टरांवर केलेला अन्याय आहे. सन २०१४ साली विधिमंडळात कायदा पारित करुन होमि ओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथी परवानगी व एम.एम.सी रजिस्टर मध्ये श्येड्युल २८ अंतर्गत सी.सी.एम.पी कोर्स रजिस्ट्रेशन बाबत रद्द केलेले परिपत्रक पूर्ववत पुन्हा सुरू करावे. अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली होती.

यावेळी गणेशराव खवणे सतीशराव निर्वळ पंजाबराव बोराडे अंकुशराव आवचार, विलास घोडके अजय अवचार आनंद जाधव मनोज देशमुख नवनाथ खंदारे बंडू नाना खरात रंगनाथ अवचार प्रा.सहदेव मोरे, डॉ दत्तात्रय काकडे डॉ. कल्याण मोरे, डॉ. स्वप्निल वायाळ, डॉ. शाम सरकटे डॉ. रमेश बोराडे, डॉ. राजेश वायाळ, डॉ. सुनील राठोड, डॉ. शरद शेळके, डॉ. विनोद चव्हाण डॉ. राहुल काळे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# मराठा समाजाला 'सरसकट आरक्षण' नाकारल्याचा डॉ. लाखे पाटील यांचा आरोप

**जालना । प्रतिनिधी -** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी राज्यभर आंदोलन सुरू असताना, सरकारने २ सप्टेंबर २०२५ रोजी हैदराबाद संस्थानातील मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत एक नवीन शासन निर्णय (ॠ) जारी केला आहे. या निर्णयानुसार, मराठा समाजातील व्यक्तींना कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी काही कठोर अटी घालण्यात आल्या आहेत. यामध्ये महसुली आणि शैक्षणिक पुराव्यांच्या नोंदी, रक्तसंबंधांद्वारे वंशावळ सिद्ध करणे आणि ओबीसी गटातील ८३ क्रमांकाचे वैध जात वैधता प्रमाणपत्र असणे अनिवार्य करण्यात आले आहे.



या शासन निर्णयामुळे मराठा समाजाला 'सरसकट मराठा आरक्षण' नाकारले असल्याचा गंभीर आरोप सकळ मराठा समाजाचे राज्य समन्वयक व अभ्यासक डॉ. संजय लाखेपाटील यांनी केला आहे. मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सरसकट आरक्षणाच्या मागणीसाठीचे आंदोलनच संपवल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

या शासन निर्णयामुळे मराठा समाजात पुन्हा एकदा असंतोष निर्माण झाला आहे. हैदराबाद गॅझेट लागू करूनही मराठा समाजाला अपेक्षित असलेला लाभ मिळणार नसल्याची भावना व्यक्त होत आहे. दुसरीकडे, या निर्णयाला ओबीसी संघटनांनी विरोध दर्शवला असून, त्यांनी न्यायालयात याचिका दाखल करण्याचा इशारा दिला आहे. यावर सरकारचा निर्णय विचारांती घेतला असून, ओबीसी समाजाचा गैरसमज दूर केला जाईल, असे विखे पाटील यांनी म्हटले आहे. यावर आता ओबीसी समाजाला स्वतंत्र समिती गठीत केल्याचीही माहिती त्यांनी दिली आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा वादग्रस्त ठरत आहे.

**प्रमुख मुद्दे:**

नवीन शासन निर्णय: २ सप्टेंबर २०२५ रोजी हैदराबाद गॅझेटमधील नोंदींच्या आधारे मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत जीआर जारी.

आवश्यक अटी: महसुली/ शैक्षणिक नोंदी, रक्तसंबंधांतून वंशावळ सिद्ध करणे, आणि ओबीसी गट क्र. ८३ चे वैध जात वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक.

**डॉ. लाखे पाटील यांचा आरोप:** या निर्णयामुळे 'सरसकट मराठा आरक्षण' नाकारले आहे, आणि सरकारने आंदोलन संपवण्याचा प्रयत्न केला आहे.

**विखे पाटील यांचे म्हणणे:** हा निर्णय विचारपूर्वक घेतला असून, ओबीसी समाजाचा गैरसमज दूर करण्यासाठी चर्चा करण्यात येईल.

**न्यायालयीन आव्हान:** या शासन निर्णयाविरोधात बॉम्बे उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत.

या सर्व घडामोडींमुळे मराठा आरक्षणाचे भवितव्य पुन्हा एकदा अनिश्चित बनले आहे.

# सदर बाजार पोलिसांची नळगल्लीतील जुगार अड्ड्यावर धाड, ४४,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील नळगल्ली भागात जुगार खेळणाऱ्या आठ आरोपींना सदर बाजार पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून रोख रकमेसह एकूण ४४,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गुरुवारी, रात्री ११.३० च्या सुमारास सदर बाजार पोलीस ठाण्याच्या डीबी पथकातील पोलीस उपनिरीक्षक श्री. म्हस्के यांना गोपनीय माहिती मिळाली की, नळगल्ली येथील शाम खताडे यांच्या घरात काही लोक 'तिर्रट' नावाचा जुगार खेळत आहेत. या माहितीच्या आधारे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परवानगीने डीबी पथकाने मध्यरात्री १२.०० वाजता त्या ठिकाणी छापा टाकला.

पोलिसांनी छापा टाकला तेव्हा, बलराम प्रभुसिंग रहाड (३५), नजीर बिस्मिल्ला शेख (५५), संतोष हिरणअप्पा खताडे (५०), राजू विठोबा अप्पा खताडे (५०), देवानंद प्रेमचंद भक्त (४५), इम्तियाजखॉन अन्वरखॉन (३८), लक्ष्मण हरीअप्पा खताडे (६०), आणि शाम महाधन अप्पा खताडे (३८) हे सर्वजण जुगार खेळताना आढळले. पोलिसांनी त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे रोख रकमेसह एकूण ४४,००० रुपयांचा मुद्देमाल सापडला.

या प्रकरणी, सदर बाजार पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप भारती यांच्या नेतृत्वात डीबी पथकाने केली. या पथकामध्ये पोउपनि शैलेश म्हस्के, पोहेकॉ जगन्नाथ जाधव, कावळे, नजीर पटेल, आणि पोकॉ दुर्गेश गोफणे, गणेश तेजनकर, धनंजय लोढे, राहुल कटकम, शिवाजी काळे व सद्दाम सय्यद यांचा सहभाग होता.

# बदला घेण्यासाठी खुनाचा कट; दोन आरोपींना शस्त्रांसह अटक

**जालना । प्रतिनिधी -** जुन्या भांडणाचा बदला घेण्यासाठी एका तरुणाचा खून करण्याच्या तयारीत असलेल्या दोन आरोपींना सदर बाजार डीबी पथकाने अटक केली आहे. आरोपींकडून तलवार, कुऱ्हाड आणि चाकू अशी धारदार शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. पोलीस ठाणे सदर बाजारच्या डीबी पथकाचे प्रमुख शैलेश म्हस्के यांना गोपनीय माहिती मिळाली की, नळगल्ली येथील दोन तरुण जुन्या भांडणातून एकाचा खून करण्याच्या तयारीत आहेत. या माहितीची खात्री करून डीबी पथकाने भारत माता मंदिराच्या पाठीमागे, नळगल्ली परिसरात शोध सुरू केला.

पोलिसांना संदीप संतोष जाधव (वय २३) आणि अमोल विश्वंभर गुंजकर (वय २१) हे दोघे संशयास्पदरीत्या सापडले. अमोल गुंजकरच्या घरातून पोलिसांनी एक धारदार कुऱ्हाड आणि एक काळ्या रंगाचा चाकू जप्त केला. चौकशीदरम्यान, त्याने सांगितले की गेल्या वर्षी होळीच्या दिवशी संदीप जाधव याला एका तरुणाने मारहाण केली होती. त्याचा बदला घेण्यासाठी ते दोघे त्या तरुणाचा खून करण्याचा कट रचत होते.

त्यानंतर पोलिसांनी संदीप जाधवच्या मित्राच्या घरी जाऊन त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून एक धारदार तलवार जप्त करण्यात आली. पोलिसांनी संदीप जाधवची चौकशी केली असता, त्यानेही जुन्या भांडणाचा बदला घेण्यासाठी तलवारीचा वापर करणार असल्याचे कबूल केले. दोन्ही आरोपींना अटक करून त्यांच्यावर भारतीय हत्यार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक संदीप भारती यांच्या नेतृत्वात डीबी पथकाने यशस्वीरित्या पार पाडली. या पथकात पोउपनि शैलेश म्हस्के, पोहेकॉ जगन्नाथ जाधव, धनाजी कावळे, नजीर पटेल, आणि पोकॉ भगवान मुंजाळ, दुर्गेश गोफणे, गणेश तेजनकर, राहुल कटकम, धनंजय लोढे आणि शिवाजी काळे यांचा सहभाग होता.

### आर्थिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई

# अठरा आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले

**जालना । प्रतिनिधी -** शेतकऱ्यांसाठी असलेल्या सरकारी अनुदानात मोठा गैरव्यवहार केल्याप्रकरणी जालना येथील आर्थिक गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईमुळे १८ आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज अंबड सत्र न्यायालयाने फेटाळून लावला आहे. या प्रकरणात एका आरोपीला अटक करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.

शासनाने सन २०२२, २०२३ आणि २०२४ मध्ये अतिवृष्टी, पूर, नापिकी आणि दुष्काळामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना अनुदान देण्यासाठी वेळोवेळी निर्णय घेतले होते. या अनुदानाच्या वाटपात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा संशय असून, यासंदर्भात अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास पोलीस अधीक्षक, जालना यांच्या आदेशानुसार आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला. या प्रकरणातील काही आरोपींनी पोलिसांपासून लपून जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केले होते. आर्थिक गुन्हे शाखेने या प्रकरणात सखोल चौकशी करून न्यायालयात सबळ बाजू मांडली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. गायधनी यांनी एकूण १८ आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले. यामुळे आरोपींना मोठा धक्का बसला आहे. याच गुन्ह्यात आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक तपास करून सुशीलकुमार दिनकर जाधव या सहाय्यक महसूल अधिकाऱ्याला बुलढाणा येथून अटक केली आहे. आरोपीला अंबड न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने त्याला १८ सप्टेंबर २०२५ पर्यंत ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. इतर फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत.

ही कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखेचे प्रभारी पोलीस उपअधीक्षक सिद्धार्थ माने, सहायक पोलीस निरीक्षक मिथुन घुगे, आणि इतर पोलीस अंमलदार यांनी यशस्वीरित्या पार पाडली. सरकारी वकील बाबासाहेब इंगळे यांनी न्यायालयामध्ये सरकारची बाजू प्रभावीपणे मांडली.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.